## दैनिक पुढारी मधील बातमी

पुढारी

# जि. प. शाळांतील मुलांची होणार 'अमेरिका वारी'

## अंतराळ संशोधनाबाबत जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी नासा व इस्रोला विद्यार्थ्यांची होणार भेट

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

अंतराळ संशोधनाबाबत जिज्ञासा निर्माण व्हावी यासाठी नासा (अमेरिका) व इस्रो (भारत) येथे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना नेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यासाठी एक परीक्षाही होणार असून, यामधून ३६ विद्यार्थ्यांची निवड होणार आहे. यामधील ९ विद्यार्थ्यांची अमेरिकेची वारी होणार आहे. राज्यातील हा पहिलाच उपक्रम असणार आहे.

खासगी शाळांच्या स्पर्धेत मराठी शाळा टिकवण्यासाठी सध्या विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. गुणवत्ताही वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याला यशही येत आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेची मुले अव्वल ठरत आहेत. विशेषत: शिष्यवृत्ती, नवोदयच्या परीक्षेत या विद्यार्थ्यांचा टक्का वाढला आहे. भविष्यात विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रज्ञ निर्माण करण्याचा पाया रोवणे, अंतराळ संशोधनावर जिज्ञासा निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे, नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनाने एक उपक्रम हाती घेतला आहे.

### उद्योगमंत्री उदय सामंत यांचा पुढाकार

जि. प. शाळेतील मुलांना नासा तसेच इस्रो या संस्थेच्या भेटीसाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घेतला आहे. विशेष म्हणजे राज्यातील असा पहिलाच उपक्रम असणार आहे. मुलांचे विमानात बसण्याचे स्वप्नसुद्धा पूर्ण होणार आहे. दरवर्षी हा उपक्रम असणार आहे.



अमेरिकेतील नासा व भारतातील इस्रो या संस्थेला गुणवंत विद्यार्थ्यांची भेट घडवण्यात येणार आहे. यासाठी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता पाचवी ते सातवीमधील एकूण तीन विद्यार्थ्यांची तालुकास्तरावर अशी एकूण २७ विद्यार्थ्यांची इस्रोसाठी निवड करण्यात येणार आहे. आणि नासासाठी प्रत्येक तालुक्यातून एक अशा एकूण ९ जणांची निवड करण्यात येणार आहे. या सर्वांना विमानाने प्रवास करावा लागणार आहे.

या परीक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. केंद्र, बीट तसेच तालुका स्तरावर परीक्षा होणार आहेत. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी पी. डी. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी वामन जगदाळे, उपशिक्षणासाठी मुरकुटे, संदेश कडव हे नियोजन करत आहेत. साधारण केंद्रस्तरावर ३० नोव्हेंबर, बीटस्तरावर ९ डिसेंबर, १४ डिसेंबरला तालुकास्तरावर, २१ डिसेंबरला जिल्हास्तरावर अशी ही परीक्षा असणार आहे.

Ratnagiri Edition
Oct 15, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## दैनिक सकाळ मधील दिनांक ०२/११/२०२२ रोजीची बातमी.

सकाळ

# विद्यार्थ्यांना नासा, इस्रो सैर!

## जिल्हा परिषदचा विद्यार्थ्यांसाठी उपक्रम; ६५ लाखांच्या निधीला तांत्रिक मंजुरी

रत्नागिरी, ता. २ : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील हुशार विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि संशोधक वृत्ती जागृत करण्यासाठी गगन भरारी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. छत्तीस निवडक विद्यार्थ्यांना नासा या अमेरिकन आणि इस्रो या भारतीय अंतराळ संस्थाची सैर घडवून आणली जाणार आहे. या दृष्टीने महत्वाचे पाऊल पडले असून जिल्हा नियोजनमधून तरतूद केलेल्या ६५ लाख निधी वितरणाला शिक्षण संचालकांनी तांत्रिक मंजुरी दिली आहे. याची अंमलबजावणी पुढील वर्षाच्या आरंभी होणार आहे.

गेल्या काही वर्षात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थी संशोधन प्रकल्प सादर करत आहेत. त्याच्यातील संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने गगन भरारी उपक्रम राबवण्यासाठी पावले उचलली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती कुमार पुजार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, शिक्षणाधिकारी वामन जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आराखडा तयार केला आहे. या प्रकल्पाला पालकमंत्री उदय सामंत यांनीही पाठबळ देत जिल्हा नियोजनमधून नासासाठी ५५ लाख रुपये आणि इस्रोसाठी १५ लाख रुपयाची तरतूद केली आहे. या प्रकल्पात अंतराळ अभ्यासात जागतिक स्तरावर काम करत असलेल्या अमेरिकेच्या नासा तर भारताच्या इस्रो संस्थेला भेटी देऊन जिल्हा परिषद मुलांना त्याची प्रत्यक्ष माहिती देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या पाचवी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. विद्यार्थी निवड प्रक्रिया डिसेंबरमध्ये राबवली जाणार आहे. यामध्ये केंद्र आणि बीट स्तरावर १०० गुणांची विज्ञान विषयावर आधारित चाचणी परीक्षा घेतली जाईल. प्रत्येक केंद्रातून दहा, बीटस्तरातून प्रत्येकी दहा, पुढे तालुकास्तरावर दहा जणांची निवड करून जिल्हा स्तरावर अंतिम निवडीसाठी पाठवण्यात येतील. यामध्ये तीन विद्यार्थिनीचा समावेश राहील. जिल्हास्तरावर परीक्षा घेऊन प्रत्येक तालुक्यातील ३ प्रमाणे २७ विद्यार्थी निवडले जाणार आहेत. तसेच इस्रो भेटीसाठी नऊ जणांची यादी बनवली जाईल. त्यात सातवीमधील प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या ९ जणांचा समावेश असेल. हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी जिल्हा परिषद अधिकारी यांची अमेरिकन एम्बसी च्या प्रतिनिधीबरोबर प्राथमिक चर्चा झाली आहे. नियोजनकडून मंजूर ६५ लाख निधीला तांत्रिक मंजुरी मिळाली असून लवकरच प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतली जाईल. त्यामुळे मार्च २०२३ पूर्वी प्रत्यक्षात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी नासा, इस्रोची सैर करणार आहेत.

> **"जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. नासामध्ये मुलांना नेण्यासाठी अमेरिकन एम्बसीशी संपर्क सुरू आहे. लवकरात लवकरच यावर कार्यवाही होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**
> **- कीर्तीकुमार पुजार,**
> मुख्य कार्यकरी अधिकारी, रत्नागिरी जिल्हा परिषद

### हा अनुभव मिळेल

लोकांना चंद्रावर आणि त्यापलीकडे नेण्याच्या नासाच्या मिशनबाबत माहिती देण्यासाठी २ मार्चला नासा स्पेस सेंटरमध्ये मार्स फेस्टिव्हल होणार असून त्यात विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. कॅलिफोर्निया सायन्स सेंटर, जोन्सन स्पेस सेंटर, सायन्स म्युझिअम कोलॅब्रेटीव्ह इंटरनॅशनल स्पेस सेंटर पाहता येईल. कॅनडी स्पेस सेंटरमध्ये शटल प्रक्षेपणसह लिफ्ट ऑफ अनुभवण्याची आणि चंद्रावरील तुकड्याला स्पर्श करण्याची संधी गगनभरारी प्रकल्पात निवडलेल्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच इस्रोमध्ये रॅकिट लॉन्च कसे करतात, याची माहिती आणि प्रत्यक्ष संवाद साधता येणार आहे.

Ratnagiri, Main
03/11/2022 Page No. 3

## दैनिक सकाळ दिनांक  १५/११/२०२२ रोजीची बातमी

सकाळ

# 'गगनभरारी'साठी शिक्षण विभाग कंबर कसून

## राजापूर पंचायत समिती; दोन हजार ८१७ विद्यार्थ्यांची चाचणी, गटशिक्षणाधिकाऱ्यांची माहिती

सकाळ वृत्तसेवा

राजापूर, ता. १५ : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील हुशार विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि संशोधक वृत्ती जागृत करण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे 'गगनभरारी' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे.

यासाठी तालुक्यातील हुशार, गुणवान आणि दर्जेदार विद्यार्थ्यांची निवड व्हावी आणि जिल्ह्यातील काही निवडक विद्यार्थ्यांसमवेत राजापूर तालुक्यातीलही विद्यार्थ्यांना भारतीय इस्रो आणि अमेरिकेतील नासा या अंतराळ संस्था अनुभवण्याची, सैर घडवण्याची संधी मिळावी म्हणून गटशिक्षणाधिकारी सखाराम कद्रू यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीचा शिक्षण विभाग कंबर कसत आहे.



राजापूर पंचायत समिती.

गगनभरावी उपक्रमासाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीसाठी तालुक्यातील १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. यासाठी या महिनाअखेरीला परीक्षा घेण्यात येणार असून जिल्हा परिषद शाळेतील पाचवी ते सातवी या वर्गांमधील सुमारे २ हजार ८१७ विद्यार्थी परीक्षेला बसणार असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी कद्रू यांनी दिली. या परीक्षेची जोरदार तयारी शाळांमध्ये सुरू असल्याचे त्यांनी या वेळी स्पष्ट केले. हे अभियान प्रभावीपणे राबवण्याची सूचना केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत देण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या उपक्रमामध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांना नासा आणि इस्रो सफर घडवण्यात येणार आहे. यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लोकांना चंद्रावर आणि त्यापलीकडे नेण्याच्या नासाच्या मिशनबाबत माहिती देण्यासाठी मार्चला नासा स्पेस सेंटरमध्ये होणाऱ्या फेस्टिव्हलमध्ये सहभागी होता येणार आहे. त्यासोबत कॅलिफोर्निया सायन्स सेंटर, जॉन्सन स्पेस सेंटर, सायन्स म्युझिअम कोलॅबरेटिव्ह इंटरनॅशनल स्पेस सेंटर पाहता येईल. कॅनडी स्पेस सेंटरमध्ये शटल प्रक्षेपणासह लिफ्ट ऑफ अनुभवण्याची आणि चंद्रावरील तुकड्याला स्पर्श करण्याची संधी गगनभरारी प्रकल्पात निवडलेल्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

इस्रोमध्ये रॉकेट लॉन्च कसे करतात याची माहिती आणि प्रत्यक्ष संवाद साधता येणार आहे. गगनभरारी उपक्रमाच्या निवड चाचणी परीक्षेच्या अनुषंगाने शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून जोरदार पूर्वतयारी केली जात असून या उपक्रमासाठी तालुक्यातील किती विद्यार्थी पात्र ठरणार, याची साऱ्यांना उत्सुकता लागून राहिली आहे.

### राजापुरातील चाचणी परीक्षेला बसणारे विद्यार्थी

| इयत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| पाचवी | ९७६ |
| सहावी | ९२५ |
| सातवी | ९१६ |
| एकूण | २८१७ |
| एकूण जिल्हा परिषद शाळा | ३५९ |
| सद्यःस्थितीत चालू शाळा | ३३१ |

Ratnagiri, Main
16/11/2022 Page No. 2

## दैनिक सकाळ दिनांक १७/११/२०२२ रोजीची बातमी

# २७ हजार विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा

## नासा, इस्रो संस्थेला भेट देण्याचा उपक्रम; ३० नोव्हेंबरला २५१ केंद्रांवर जिल्हा परिषदेतर्फे नियोजन

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. १७ : अंतराळाचा अभ्यास करणाऱ्या नासा, इस्रोसारख्या संस्थांना भेटी देण्याचा उपक्रम रत्नागिरी जिल्हा परिषदेकडून हाती घेण्यात आला असून, त्याला जिल्हा नियोजनमधून ७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या २५१ केंद्रांतील पावणेतीन हजार शाळांमधील २७ हजार विद्यार्थ्यांची ३० नोव्हेंबरला चाळणी परीक्षा घेण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद शाळांमधून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमधून अव्वल दर्जाचे अधिकारी घडत आहेत. ग्रामीण भागातील काही विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासक, वैज्ञानिक किंवा संशोधक घडण्याची क्षमता असते. अशा विद्यार्थ्यांना शोधून काढून त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी शिक्षण विभागाने नासा, इस्रोसारख्या संशोधन संस्था विद्यार्थ्यांना पाहता याव्यात यासाठी कार्यक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमासाठी अभ्यासू विद्यार्थी निवडले जाणार आहेत.






केंद्र, बीट, तालुका आणि जिल्हा अशा चार स्तरावर परीक्षा घेऊन त्यातून नासासाठी नऊ, तर इस्रोसाठी २७ विद्यार्थी निवडले जातील. यात विद्यार्थिनींचाही समावेश असेल. या संदर्भात ११ नोव्हेंबरला मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकुमार पुजार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, शिक्षणाधिकारी वामन जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेण्यात आले. ३० नोव्हेंबरला केंद्रस्तरावर चाळणी परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये पाचवी ते आठवीपर्यंतचे २७ हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यामधून बीटस्तरावरील परीक्षेसाठी दोन हजार ५१० विद्यार्थी निवडले जातील. तालुकास्तरावरील परीक्षेसाठी ५५० विद्यार्थी निवडण्यात येणार आहेत. यामधून जिल्हास्तरीय परीक्षेसाठी ९० जणांना संधी मिळेल. अंतिम परीक्षा घेतल्यानंतर २७ विद्यार्थी इस्रोसाठी व नासाला नऊ जणांना संधी दिली जाईल. शेवटच्या निवडीसाठी मुलाखत आणि प्रात्यक्षिक घेतले जाणार आहे. या परीक्षेसंदर्भात माहिती देताना उपशिक्षणाधिकारी एस. जे. मुरकुटे म्हणाले, की परीक्षा या विज्ञानावर आधारित घेतल्या जातील. जीवशास्त्र, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रावर आधारित वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी अशा १०० गुणांची प्रश्नावली विद्यार्थ्यांना सोडवण्यास देण्यात येणार आहे. त्यात अव्वल आलेल्यांना पुढे संधी मिळत जाईल.

### नासा भेटीसाठी अमेरिकन दूतावासाशी चर्चा

अमेरिकेच्या नासा या अंतराळ अभ्यास संस्थेला भेट देण्यासाठी अमेरिकन दूतावासाशी चर्चा सुरू आहे. यासाठी पालकमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी जिल्हा परिषद अधिकाऱ्यांमार्फत प्राथमिक चर्चा झाली असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे.

**“ नासा, इस्रो भेट उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळणार असून, भविष्यात एखादा संशोधक निर्माण होऊ शकेल. या परीक्षेमुळे विज्ञानाची आवड निर्माण करता येईल.**

**- कीर्तिकुमार पुजार,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

दैनिक सकाळ दिनांक २०/११/२०२२ रोजीची बातमी

सकाळ

# दापोलीकर अवकाश भरारीसाठी सज्ज

## गटशिक्षणाधिकारी अण्णासाहेब बळवंतराव; इस्त्रो नासा चाळणी परीक्षा तयारी पूर्ण

सकाळ वृत्तसेवा

गावतळे, ता. २० : विविध स्तरांमधून चाळणी इतिहासात प्रथमच जि.प. शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेने इस्रो आणि नासावारीसाठी संधी उपलब्ध करून दिली आहे. दापोलीतून कोणते भाग्यवंत, गुणवंत विद्यार्थी असतील याची उत्सुकता सर्वांनाच असूनच, शाळेतील शिक्षक आपलाच विद्यार्थी कसा निवडला जाईल, यासाठी प्रयत्नांची शिकस्त करत आहेत.

जिल्हा परिषद शाळेतील ५ वी ते ७ वीमध्ये असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना



गावतळे : नासा इस्रो बैठकीत चांगले काम करणाऱ्यांचा सत्कार करताना गटशिक्षणाधिकारी अण्णासाहेब बळवंतराव व मान्यवर.

या संधीचा लाभ घेता येणार आहे. मन, मेंदू आणि मनगट सक्षमीकरणासाठी सदैव तत्पर असलेला दापोली शिक्षण विभाग अवकाश भरारीसाठी सज्ज असल्याचे गटशिक्षणाधिकारी अण्णासाहेब बळवंतराव यांनी सांगितले. यासाठी ३० नोव्हेंबरला केंद्रस्तरावरील पहिली चाळणी परीक्षा होणार असून प्रत्येक केंद्रातून १० असे २७० विद्यार्थी प्रभागस्तरावरील चाळणीसाठी प्रविष्ठ होतील. तर प्रत्येक प्रभागातून १० प्रमाणे तालुका चाळणीसाठी ६० आणि तालुक्यातून जिल्हा चाळणीसाठी १० विद्यार्थी जिल्हास्तरासाठी निवडले जाणार आहेत. शेवटी इस्रोसाठी ३ आणि नासासाठी १ असे २६ विद्यार्थी निवडण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, अवकाश संशोधन जिज्ञासा निर्माण करणे, नवनवे तंत्रज्ञान ओळख करून घेणे यासाठी जिल्हा प्रशासनाने इस्रो आणि नासासारख्या संस्थेला गुणवंत विद्यार्थ्यांची भेट घडवण्यात येणार आहे. त्यातून भावी संशोधक तयार व्हावेत हा दृष्टिकोन असल्याचे अण्णासाहेब बळवंतराव यांनी पुढे सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कितीकुमार पुजार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परिक्षित यादव, शिक्षणाधिकारी बापूसाव जगदाळे, उपशिक्षणाधिकारी सुधाकर मुरकुटे, संदेश कडव, दापोली गटविकास अधिकारी आर. एम. दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी माध्यमाचे २ हजार ३९८ तर उर्दू माध्यम ३३७ असे एकूण २ हजार ७३५ विद्यार्थी पहिल्या चाळणी परीक्षेसाठी २६ केंद्रांमधून प्रविष्ठ होणार आहेत.

Ratnagiri Ratnagiri-Today
21/11/2022 Page No 3